# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - शोध
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. संगीता गुरव

---

निसर्गाची उधळण
रंगीबेरंगी फुलपाखरे
पाखरांचे मंजुळ स्वर
वातावरण गंधित...
कोवळ्या उन्हांत अंगणात
दुधाच्या ओठातून गोड हुंकार सानुल्या स्वरात...
कदाचित, इथूनच निर्माण झालं असावं संगीत !

एका रम्य तळ्याकाठी
छुमकत ठुमकत येते ललना
तिच्या हातातली घागर घरंगळतांनाचा स्वर
पुन्हा अलगद सावरून घागर झुकते पाण्यात
तेव्हाही विविध तरंग उमटतात...
शांतता भंग करत...
कदाचित, इथूनच निर्माण झालं असावं संगीत !

राम प्रहरी कोंबड्यांची बांग
गुरांच्या घुंगुरमाळांचा आवाज
लगबगीने बांगड्यांची किनकिन
हंडे बादल्या आपटत
विहिरीवर मोट जडपणे वर खाली
सुरू होतोय दिवस कुरकुरत...
कदाचित, इथूनच निर्माण झालं असावं संगीत !

Arhant Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

सकाळी गडबडीच्यावेळी
किचन कट्ट्यावर पळ्या सांडश्या
कपबश्याही बोलत असतात काहीतरी
रिकामटेकड्या आजोबांचा
चुरचुरणारा पेपर..
आजीची घंटा खणखणतांना
आवाज न करता दिव्याची फडफड
लगेच तिचं चुकचुकणं... आतल्या आत

परत दुपारच्या शांततेत दारे खिडक्या आपटत
मध्येच घुसलेला बेभान वारा
काळ्या ढगातून पत्र्यावर मुसळधार ताशा
एखादा कुत्रं वर तोंड करून तालबद्ध रडतं
हं हाच... हो अगदी हाच असावा....
नैसर्गिक स्वर .. ओमकार... नादब्रम्हात
कदाचित, इथूनच निर्माण झालं असावं संगीत !!

Anahat Music Therapy